रजि. नं : सी. ३४६ स्थापना : १२ मे १९४५

**कळवा मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्था मर्यादित**

**कळवा, ठाणे - ४०० ६०५.**

# सहकार बझार

## २०२५-२०२६

ऑडिट वर्ग "अ"

## ८२ वा वार्षिक अहवाल



स्वस्त दरात भव्य तांदूळ विक्री महोत्सव



तांदूळ विक्री महोत्सव प्रसंगी मान्यवर उद्घाटक



वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित सभासद


मुख्य कार्यालय : सहकार इमारत, स्टेशन रोड, कळवा, ठाणे - ४०० ६०५

संपर्क फोनः ८२९१९३८०८१ ई-मेल : info@sahakarbazar.com वेबसाईट : www.sahakarbazar.com


सुचना : सभासदांनी स्वतःच्या इ-मेल आय. डी. व मोबाईल क्रमांकाची नोंद मुख्य कार्यालयात करावी.

# कळवा मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्था मर्यादित - कळवा, ठाणे - ४०० ६०५



आमचे श्रध्दास्थान
**कै. मा. गोपीनाथ शिवराम पाटील**



संस्थेचे भाग्यविधाते
**श्री.नारायण ग. गावंड**
माजी चेअरमन / संचालक

## विद्यमान संचालक मंडळ सन २०२२ ते २०२७



**श्री. रमेश दा. बांगर**
चेअरमन



**श्री. रामदास न. भोईर**
व्हा. चेअरमन



श्री.विक्रम गो. पाटील



श्री.दशरथ का.पाटील



श्री.अशोक ना.भोईर



श्री.कय्युम चेऊलकर



श्री.आगतराव पं.दोडके



श्री. चंद्रकांत भ.माळी



श्री.कुंदन हि. पाटील



श्री.अशोक हि. शिंपी



श्री.सतिश शं. पाटील



श्री.गोरख र.गोसावी



श्री.आशिष द.पाटील



सौ.सुवर्णा रा. गौरी



सौ. उषा नं. पाटील



डॉ. आशा आर.पाटील
तज्ञ संचालिका



श्री. विशाल ह. भानुशाली
तज्ञ संचालक



श्री.अमित प्र.ओजाळे
चिटणीस



श्री.अरुण वि. कोळी
व्यवस्थापक



वार्षिक उलाढाल ३१ कोटीच्यावर

## ✻ नियंत्रण समिती ✻

श्री.सुनिल आ.जोशी, श्री.गोपाळ शं.कदम
श्री.विद्याधर य.भिडे, श्री.रोहिदास शि.पाटील
श्री.बबन हौ.पाटणकर

## ✻ तक्रार निवारण समिती ✻

श्री.चंद्रकांत शं.खराडे श्री.शिरीष रा.नागले
श्री.राजेश दि.करलाद

## ✻ अंतर्गत तक्रार समिती (महिला) ✻

सौ.सेजल स.पर्वते श्री.संजय शां.पंदेरकर
सौ.साधना ल.एकबोटे सौ.अक्षया सं.म्हात्रे
सौ.देवयानी यो.गवळे

## अधिकारी वर्ग

श्री.संजय शां.पंदेरकर श्री.आनंद भा.गायकवाड
सौ.सेजल स.पर्वते श्रीमती कविता प्र.पाटील
सौ.मेघा म.सुखदरे

## ✻ सभासद अंतर्गत हिशेब तपासणीस ✻

| | | |
|---|---|---|
| श्री.योगेश विजयानंद सोनावणे | श्री.दिपक पांडुरंग करलाद | श्री मिलिंद मधुसूदन दवणे |
| श्री.पंढरीनाथ दगा सुर्यवंशी | श्री.सोमनाथ तुकाराम खतोडे | श्री.अशोक गणपत कांबळे |
| श्री.यशवंत विक्रम चव्हाण | श्री.कैलास जयराम भोपी | श्री.विजय शाम मुंबईकर |
| श्री.संजय जगन्नाथ चुंबळे | श्री.गोपिनाथ कृष्णाजी पेंडूरकर | श्री.सुहास रामदास सावळे |
| श्री.रघुनाथ मारुती चव्हाण | श्री.सुर्यकांत जगन्नाथ सोनार | श्री.भास्कर दत्तू भोईर |
| श्री.मधूकर प्र.राजाध्यक्ष | श्री.श्रीपाद माधव देशपांडे | श्री.रंगनाथ नारायण गरुड |

## ✻ बँकर्स ✻

दि. ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कळवा, ठाणे
जी.पी.पारसिक जनता सहकारी बँक लि., कळवा, ठाणे
आय.सी.आय.सी.आय.बँक,कळवा, ठाणे
युनिटी स्मॉल फायनान्स बँक, ठाणे
एच.डी.एफ.सी बँक,कळवा, ठाणे

## ✻ वैधानिक लेखापरीक्षक ✻

**मेसर्स बी.एस.कोरडे ॲंड कंपनी चार्टड अकौंटंट**
कळवा, ठाणे ४०० ६०५

## ✻ अंतर्गत लेखापरीक्षक ✻

**श्री.सुरेश आर.बारी प्रमाणित लेखापरीक्षक**
कळवा, ठाणे - ४०० ६०५

## ✻ मूळ संस्थापक ✻

| क्र. | नाव | वय | व्यवसाय | राहण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.दत्तात्रय भिकाजी पालये | ३३ | टेलरिंग | कळवा, जि.ठाणे |
| २. | श्री.राजाराम व्ही. कर्णिक | ६६ | गव्ह.पेन्शनर | कळवा, जि.ठाणे |
| ३. | श्री.अनंत ज.जोशी | ४० | म्यु.म.शिक्षक | कळवा, जि.ठाणे |
| ४. | श्री.व्ही.डी.आर्यमाने | ४६ | कमि.एजंट | कळवा, जि.ठाणे |
| ५. | श्री.महम्मद अब्बास दादामिया राऊत | ४२ | कॉन्ट्रॅक्टर | कळवा, जि.ठाणे |
| ६. | श्री.विनायक ना.खारकर | ६२ | --- | कळवा, जि.ठाणे |
| ७. | श्री.महम्मद युसुफ मकबा | ४० | धंदा | कळवा, जि.ठाणे |
| ८. | श्री.शेरअली अली महम्मद | ३१ | धंदा | कळवा, जि.ठाणे |
| ९ | श्री.भालचंद्र गोपाळ पालये | ३२ | नोकरी | कळवा, जि.ठाणे |
| १०. | श्री.पांडुरंग बाळू फर्मन | ४७ | शेती | कळवा, जि.ठाणे |
| ११. | श्री.काशिनाथ नारायण टकले | ६० | रिटायर्ड | कळवा, जि.ठाणे |
| १२ | श्री.बाळाराम अनंत वैद्य | ६० | रिटायर्ड | कळवा, जि.ठाणे |

रजि. न. सी. ३४६ स्थापना : १२ मे, १९४५

# ब्याऐंशीवी वार्षिक सर्वसाधारण सभा

## सभेची सूचना

आपल्या संस्थेची सन २०२५-२०२६ ची ब्याऐंशीवी वार्षिक सर्वसाधारण सभा, शुक्रवार दि २१ ऑगस्ट २०२६ रोजी, सकाळी ठीक ११.०० वाजता "गडकरी रंगायतन " तलावपाली, ठाणे" येथे आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

## सभेपुढील विषय

१) दि.१७ ऑगस्ट २०२५ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत वाचून सदर सभेतील विषयांना मंजूरी देणे
२) दि.३१ मार्च २०२६ अखेरचा अहवाल, व्यापारीपत्रक, नफा-तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक व संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२५-२०२६ आर्थिक वर्षाची नफा वाटणी व लाभांश वाटणीस मंजूरी देणे
३) पोटनियम क्र.३ मधील मर्यादेस अधिन राहून पुढील वर्षाकरीता उभारावयाच्या बाहेरील कर्जाच्या मर्यादा ठरविणे
४) मागील आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षणाच्या अहवालाची व मागील वर्षाच्या लेखापरीक्षणाच्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे
५) सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करण्याचा व त्यांचे सेवाशुल्क ठरविण्याचा अधिकार संस्थेच्या संचालक मंडळास देणे
६) सन २०२५-२६ च्या अंदाज पत्रकाच्या कमी-जास्त झालेल्या खर्चास मान्यता तसेच सन २०२६-२७ वर्षाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे
७) संस्थेमार्फत घरगुती व इतर उपयोगाकरीता व त्याच्या अनुषंगाने कोणता माल पुरवावयाचा ते ठरविणे व अशा पुरवठयावर किती कमिशन व इतर खर्च घ्यावयाचे ते ठरविणे
८) चिटणीसांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे
९) नियंत्रण समिती व तक्रार निवारण समितीची नेमणूक करणे
१०) सन २०२६-२०२७ या वर्षाकरिता अंतर्गत लेखापरीक्षक यांची निवड करणे व मेहनताना ठरविणे
११) सभासदांपैकी अंतर्गत हिशोब तपासणीसांची निवड व मेहनताना ठरविणे
१२) सभासद गैरहजर असल्यास त्यांची अनुपस्थिती मंजूर करणे
१३) मा.अध्यक्षाच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे

दिनांक : ३०/०७/२०२६
कळवा, ठाणे – ४०० ६०५

संचालक मंडळाच्या आदेशावरुन
**श्री. अमित प्रभाकर ओजाळे**
**चिटणीस**

टिप :-

१. **सभेस फक्त सभासदांनाच प्रवेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी, तसेच इतर सभासदांचे अहवाल आणल्यास ते स्विकारले जाणार नाही.**
२. सभेसाठी निश्चित केलेल्या वेळेपासून अर्ध्या तासाच्या आत जर गणसंख्या पूर्ण झाली नाही तर सभा स्थगित केली जाईल व अशी स्थगित सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेतली जाईल. या स्थगित सभेस पोटनियम क्र.३१ नुसार गणपूर्तीची व वेगळया सूचनेची आवश्यकता राहणार नाही.
३. सभेसाठी हजर असलेल्या सभासदांनी उपस्थितीबद्दल प्रमाणपत्र घ्यावे.
४. वार्षिक अहवाल संस्थेच्या सर्व शाखांमध्ये व वेबसाइटवर www.sahakarbazar.com उपलब्ध आहे.

## -: सभासदांस नम्र सूचना :-

१. उपस्थिती प्रमाणपत्र सभा नोटीसीचा भाग असल्याने सभेची नोटीस सोबत असल्याशिवाय सभागृहात प्रवेश दिला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

२. सभासदांना काही माहिती आवश्यक असल्यास अगर काही सूचना करावयाच्या असतील तर त्या दि. १० ऑगस्ट २०२६ पर्यंत मुख्य कार्यालय, कळवा येथे पोहोचतील अशा बेताने पाठवाव्यात.

३. ज्या सभासदांनी समभागांची प्रमाणपत्रे, समभागांचा लाभांश अद्याप नेलेले नसतील, त्यांनी ते कार्यालयातून कार्यालयीन वेळेत घेऊन जाणे, अन्यथा सतत तीन वर्षे लाभांश न नेल्यास, नियमानुसार राखीव निधीत जमा केला जाईल. तसेच आपल्या बदललेल्या पत्त्याची नोंद कार्यालयात करणे जरुरी आहे. म्हणजे संस्थेस पत्रव्यवहार करणे सोयीचे जाईल.

४. **सभासदांनी आपल्या व मित्रपरिवाराच्या जीवनावश्यक वस्तू, औषधे व गृहोपयोगी वस्तूंची खरेदी संस्थेच्या भांडारातून करुन एका जागरुक ग्राहकाचे कर्तव्य पूर्ण करावे व इतर ठिकाणच्या फसव्या योजना व सवलतींच्या मोहाला बळी न पडता फसवणुकीस आळा घालावा.**

संचालक मंडळाच्या आदेशावरुन
**श्री. अमित प्रभाकर ओजाळे**
**चिटणीस**

## ❋ थोडक्यात दृष्टीक्षेप ❋

| | | |
|---|---|---|
| १)सभासद | : | ७५७७ |
| २) भागभांडवल | : | रु.१०४.०७ लाख |
| ३) राखीव व इतर निधी | : | रु.४२५.१२ लाख |
| ४)वार्षिक उलाढाल | : | रु.३१.७४ कोटी |
| ५) खेळते भांडवल | : | रु. १२.२१ कोटी |
| ६) शेअर्स लाभांश | : | १२ % |
| ७) ऑडीट वर्ग | : | "अ" सुरुवातीपासून |
| ८)खरेदीवरील सूट | : | जीवनोपयोगी वस्तू व औषधे खरेदीवर सभासदांस १% व बिगर सभासदांस १/२% ग्राहक बोनस, छापील किंमतीपेक्षा ५% ते ५०% पर्यंत कमी दर आणि सणासुदीच्यावेळी आकर्षक भेटवस्तू योजना, मेडीकल स्टोअर्समधील खरेदीवर १८% पर्यंत सवलत. |
| ९) शाखा | : | १) स्वयंसेवा भाण्डार – दहा , २) मेडिकल स्टोअर्स - एक, ३) शिधावाटप दुकाने – सहा, ४) दुध विक्री केंद्रे – दहा |
| १०) शैक्षणिक उत्तेजनार्थ | : | सभासदांच्या व कर्मचाऱ्यांच्या पाल्यास प्रत्येक वर्गातील गुणानुक्रमांकानुसार इयत्ता १०वी ते १५वी कला,वाणिज्य,विज्ञान व इतर शाखेतील एकूण ५५ विद्यार्थ्यांस रोख पारितोषिक वाटप. |
| ११) सामाजिक | : | पर्यावरण समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण, सभासद व कर्मचा-यासाठी आरोग्य शिबीर, तसेच महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ साजरे केले जातात. |
| १२) कार्यालयीन वेळ | : | सकाळी ९.३० ते संध्याकाळी ७.००, लंचटाईम १.३० ते २.००, साप्ताहिक सुट्टी शुक्रवार. |

# -: ब्याऐंशीवा वार्षिक अहवाल :-

## सन २०२५-२०२६

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

संस्थेच्या ब्याऐंशीव्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये संचालक मंडळाच्या वतीने आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत करीत आहे. सन २०२५-२६ या वर्षाचे वैधानिक लेखापरीक्षक यांनी प्रमाणित केलेला अहवाल संचालक मंडळाच्या वतीने आपणापुढे सादर करताना आनंद होत आहे.

संस्थेने ग्राहक सेवेतील प्रदीर्घ गौरवशाली परंपरा जोपासुन सहकाराच्या मार्गावर यशस्वी वाटचाल सुरु ठेवलेली आहे. ग्राहकांना निर्भेळ व स्वच्छ जीवनावश्यक माल कमी दरात उपलब्ध करुन देणे हे ध्येय संस्थेने दृष्टीसमोर ठेवलेले आहे. यासाठी दरवर्षी स्वस्त दरात भव्य तांदूळ,गहू,डाळी व इतर मालाचा विक्री महोत्सव आयोजित करण्यात येतो. ग्राहकांच्या हितासोबत सामाजिक बांधिलकीच्या नात्याने गेल्या आर्थिक वर्षामध्ये अतिवृष्टीमुळे पुरग्रस्त झालेल्या सोलापूर जिल्हयातील वडशिंगे व उंदरगांव येथील नागरिकांना २२ जीवनावश्यक वस्तूंची एकूण १०० पाकिटे वाटप करण्यात आली. या आधुनिक स्पर्धेच्या युगात संस्थेला कमीत कमी नफा घेऊन कर्मचारी,जागाभाडे,वीज,शासकीय कर इत्यादींवर वाढणाऱ्या खर्चाचा समतोल साधावा लागत आहे. यासाठी सर्व सभासदांनी संस्थेच्या शाखांमधून खरेदी करुन विक्रीवाढीस सहकार्य केल्यास भविष्यात संस्थेला अधिकाधिक उत्तम प्रकारे सेवा पुरविता येईल, असे आपणास नम्र आवाहन करीत आहे.

### सभासद व भाग भांडवल

मागील वर्षी ७५५८ सभासदांचे भागभांडवल रु.१०३.०४ लाख जमा होते. अहवाल साली सभासद संख्येत ५५ ची वाढ झाल्याने रु.४.०८ लाखाने भागभांडवल वाढ झाली. तसेच ३६ सभासदांनी भागभांडवल परत नेल्याने दि. ३१ मार्च २०२६ अखेरीस एकूण ७५७७ सभासदांचे वसूल भागभांडवल रु.१०४.०७ झाले आहे.

### व्यवहार आणि उलाढाल

संस्थेची मागील वर्षी एकूण विक्री रु.३०.१९ कोटी होती व व्यापारी नफा रु.४.०३ कोटी होता. सन २०२५-२०२६ वर्षात त्यामध्ये वाढ होवून एकूण विक्री रु.३१.७४ कोटी व व्यापारी नफा रु.४.३२ कोटी झाला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत विक्रीमध्ये रु.१.५५ कोटी व व्यापारी नफ्यामध्ये रु.०.२९ कोटीने वाढ झाली आहे. सभासदांनी संस्थेच्या शाखांमार्फत आपली व मित्रपरिवाराची जीवनावश्यक किराणा मालाची खरेदी करुन घरपोहोच सेवा घ्यावी व आपली बचत वाढवावी.

## स्वयंसेवा भाण्डारे

मागील वर्षी स्वयंसेवा भांडारांची एकूण विक्री रु.२७.५१ कोटी झाली होती. त्यामध्ये रु.१.६६ कोटीने वाढ होवून अहवाल वर्षात सर्व स्वयंसेवा भांडारांची एकूण विक्री रु.२९.१७ कोटी झाली आहे. स्वयंसेवा विभागामध्ये डिजिटल बँकींग सुविधा व खरेदीवर कंपन्यातर्फे इतर सवलतीचा ग्राहक वर्ग लाभ घेत आहेत. तसेच गणपती, दिवाळी, ईद व ख्रिसमस या सणानिमित्ताने तसेच वर्धापन दिनानिमित्त शाखांमध्ये ग्राहक भेटवस्तू योजना सुरु असतात, त्याचाही सभासदांनी लाभ घ्यावा. संस्थेच्या धोरणानुसार सर्व सभासदांना व ग्राहकांना कमीत कमी विक्रीदरात मालाचा पुरवठा करीत असल्याने बाहेरील भाववाढीवर अप्रत्यक्षपणे नियंत्रण आलेले आहे.

## मेडिकल स्टोअर्स

संस्थेच्या मेडिकल स्टोअर्समध्ये औषधांवर कमीत कमी विक्रीदर असल्याने परिसरातील तसेच दूरवरचे ग्राहक त्याचा लाभ घेत आहेत. मागील वर्षी मेडिकल स्टोअर्सची विक्री रु.२०८.६० लाख व व्यापारी नफा रु.२७.०१ लाख होता.अहवाल साली मेडिकल स्टोअर्सची एकूण विक्री रु.२०६.९६ लाख व व्यापारी नफा रु.२७.७० लाख इतका झाला आहे. मेडिकल स्टोअर्स स्थापनेपासून सर्व औषधांवर छापील किंमतीपेक्षा कमी विक्रीदर आकारत असून सध्या १८% पर्यंत सूट देत असून घरपोहोच सेवाही देत आहोत, याचा ग्राहकांनी लाभ घ्यावा.

## दूध विभाग

आपली संस्था वारणा व गोवर्धन दूध संघाची अधिकृत वितरक आहे. मागील वर्षी दूध विभागाची विक्री रु.५५.८१ लाख व व्यापारी नफा रु.२.८४ लाख होता. अहवाल वर्षात दुधाची विक्री रु.५०.२७ लाख झाली असून व्यापारी नफा ३.१८ लाख इतका झाला आहे. सभासदाना विनंती करण्यात येते की, स्वच्छ व निर्भेळ दुधाची संस्थेतून कमी दरात खरेदी करुन आपली बचत वाढवावी.

## शिधावाटप विभाग

मागील वर्षी शिधावाटप विभागाची विक्री रु.३.०८ लाख झाली होती व व्यापारी तोटा रु.०.१९ लाख होता. अहवाल वर्षात शासनाने लाभार्थी शिधापत्रिकाधारकांना मोफत धान्य वाटप केल्याने शिधावाटप विभागाची फक्त साखरेची विक्री रु.०.०६ लाख झाली आहे. तसेच व्यापारी तोटा रु.०.४४ लाख झाला आहे.

## अंतर्गत हिशोब तपासनीस

संस्थेचे दफ्तरी हिशोब स्वयंप्रेरणेतून सभासदांमधून नियुक्त झालेले सदस्य तपासणी करीत असतात. अहवाल साली एकूण १८ सभासदांची हिशोब तपासनीस म्हणून निवड करण्यात आली होती. त्यापैकी बहुतांशी हिशोब तपासनीसांनी वैयक्तिक कामातून वेळ काढून आपल्यावर सोपविलेली कामाची जबाबदारी पूर्ण केली आहे. त्याबद्दल त्यांचे मी आभार मानतो.

## नफा वाटणी

संस्थेस दि. ३१ मार्च २०२६ अखेर निव्वळ नफा रु. ३६,८९,२१८.३३ झाला असून, त्यामध्ये मागील वर्षाचा शिल्लक नफा रु.१०४३.९० मिळून नफा वाटणीस रु.३६,९०,२६२.२३ एवढी रक्कम राहते. सदर नफा विभागणीची शिफारस संचालक मंडळाने पुढीलप्रमाणे केली असून, ती आपणापुढे मंजूरीसाठी ठेवली आहे.

| | | |
|---|---|---|
| **एकूण नफा** | **रु.** | **३६,९०,२६२.२३** |
| राखीव निधी २५% | रु. | ९,२२,५६६.०० |
| शेअर्स लाभांश १२% | रु. | १२,१९,३९१.०० |
| धर्मादाय निधी १% | रु. | ३६,९०३.०० |
| लाभांश समकरण निधी १% | रु. | ७३.८०६.०० |
| अधिलाभांश समकरण निधी २% | रु. | १,८४,५१४.०० |
| तारण किंमत चढउतार निधी १% | रु. | ३६,९०३.०० |
| वरील वाटप **रु. २४,७४,०८३.००** | | |
| उर्वरीत नफा वाटप **रु. १२,१६,१७९.२३** | | |
| इमारत निधी | रु. | ६,६४,०००.०० |
| विशेष विकास निधी ५% | रु. | ६०,८०९.०० |
| सभासद कल्याण निधी ५% | रु. | ६०,८०९.०० |
| स्पेशल इमर्जन्सी निधी ५% | रु. | ६०,८०९.०० |
| गरजांमध्ये बदल करणेबाबत १0% | रु. | १,२१,६१८.०० |
| ग्राहक अधिलाभांश निधी १५% | रु. | १,८२,४२७.०० |
| मेहनताना | रु. | ६५,०००.०० |
| पुढील वर्षाकरिता शिल्लक नफा | रु. | ७०७.२३ |
| **एकूण नफा** | **रु.** | **३६,९०,२६२.२३** |

## लेखापरीक्षण

संस्थेचे सन २०२५-२०२६ या वर्षाचे वैधानिक लेखापरीक्षण मे.बी.एस.कोरडे अँड कंपनी चार्टर्ड अकौटंट, यांनी पूर्ण केले असून लेखापरीक्षण वर्ग **“अ”** कायम केला आहे व कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले आहे. सन २०२५-२०२६ या वर्षाचे अंतर्गत लेखापरीक्षण श्री.सुरेश आर बारी प्रमाणित लेखापरीक्षक यांनी पूर्ण केले असून संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले आहे.

## विद्यार्थी गुणगौरव

संस्था सभासदांच्या व कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी पारितोषिके वितरण करीत असते. यावर्षी इयत्ता १० वी ते १५ वी पर्यंत कला, वाणिज्य, विज्ञान व इतर शाखेतील एकूण ५५ विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके, सन्मानचिन्हे, प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. सभासदांना आवाहन करण्यात येते की, आपल्या पाल्यांना गुणगौरव समारंभात भाग घेण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

## नियंत्रण समिती

नियंत्रण समितीचे संस्थेच्या कारभारावर नेहमीच लक्ष असते.  अहवाल सालात नियंत्रण समितीच्या १३ सभा झाल्या. सभेला उपस्थिती चांगली होती.

### संचालक मंडळ

संस्थेच्या प्रगतीमध्ये माजी चेअरमन तथा संस्थेचे भाग्यविधाते मा.श्री. नारायण गावंड साहेब यांचा सिंहाचा वाटा आहे. श्री. नारायण गावंड साहेब हे त्यांच्या सहकार क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभवामुळे त्यांची महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडेरशन लिमिटेड मुंबई या संस्थेत संचालक पदावर बिनविरोध निवडून आल्याबद्दल संस्थेला अभिमानास्पद बाब आहे. तसेच संचालक मंडळाचेही मोलाचे सहकार्य असते. संचालक मंडळाच्या अहवाल वर्षात एकूण १४ सभा झाल्या. सर्व सभांना संचालकांची उपस्थिती चांगली होती. तसेच सभेमध्ये सर्व निर्णय एकमताने घेण्यात आले. संस्थेचा व्यवहार दिवसेंदिवस वाढत असून, दैनंदिन व्यवहार कायदेशीर व सुरळीत चालण्यासाठी योग्य वेळी योग्य निर्णय घेणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी मला माजी चेअरमन श्री. नारायण गावंड यांचे कुशल मार्गदर्शन तसेच व्हाईस चेअरमन श्री. रामदास भोईर व चिटणीस श्री. अमित ओजाळे यांचेही चांगले सहकार्य लाभले.

### तक्रार निवारण समिती

तक्रार निवारण समितीच्या २ सभा झाल्या. अहवाल सालात तक्रार निवारण समितीपुढे कोणतीही तक्रार आली नाही.

### कर्मचारी वर्ग

संस्थेचे प्रत्यक्ष कामकाज कर्मचारी वर्ग सांभाळीत असतो. कर्मचाऱ्यांची दैनंदिन कामकाजामध्ये कार्यक्षमता वाढविण्यासाठी अनेक उपक्रम राबविले जातात. संस्था डॉ.विठ्ठलराव विखे पाटील सहकारी प्रबंध संस्थान, पुणे तसेच महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ पुणे येथे कर्मचा-यांना प्रशिक्षणासाठी पाठवित असते. तसेच संस्था मागील बारा वर्षांपासून कायम कर्मचा-यांसाठी विमा कंपनीकडून अपघात विमा पॉलिसी घेत असून, यावर्षीही प्रती कर्मचारी रु ५,००,०००/- चा विमा घेऊन त्याचा हप्ता टाटा ए.आय.जी.विमा कंपनीकडे संस्थेने भरणा केलेला आहे.

### श्रध्दांजली

अहवाल वर्षात दिवंगत झालेले ज्ञात-अज्ञात सभासद, हितचिंतक तसेच वीरमरण आलेल्या भारतीय जवानांना संस्थेच्या वतीने त्यांच्या स्मृतीस विनम्रपूर्वक अभिवादन करुन भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

### आभार व समारोप

ठाणे भूषण व सहकार महर्षी स्वर्गीय मा.दादासाहेब तथा कै. गोपीनाथ शिवराम पाटील यांनी आखून दिलेली सहकाराची मूलभूत तत्वे डोळ्यांसमोर ठेवून संस्थेची यशस्वी वाटचाल सुरु आहे. संस्थेच्या दैनंदिन कामकाजात व वाटचालीत अनेकांचे सहकार्य लाभले. त्यामध्ये स्थानिक आमदार, मा. सहकार आयुक्त, पुणे, मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे शहर, तसेच ठाणे महानगरपालिकेचे मा. महापौर, विरोधी पक्षनेते, सभागृह नेते व मा. उपमहापौर, मा. नगरसेवक, वित्तीय संस्था या सर्वांचे अधिकारी व सेवकवर्ग, संस्थेचे वैधानिक लेखापरीक्षक श्री.मे.बी.एस.कोरडे अँड कंपनी, चार्टर्ड अकौटंट, अंतर्गत लेखापरीक्षक श्री.सुरेश आर.बारी प्रमाणित लेखापरीक्षक, सभासद सहकारी संस्था, संस्थेचे सभासद व ग्राहक या सर्वांचे सहकार्य लाभले. या सर्वांनी केलेले सहकार्य मोलाचे आहे. त्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानीत आहे.

संस्थेच्या ब्याऐंशीव्या वर्षांच्या प्रगतीत व यशस्वी वाटचालीत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष आपले सर्वांचे सहकार्य आहे ते असेच वृध्दींगत व्हावे, ही इच्छा व्यक्त करुन हा अहवाल पूर्ण करीत आहे.

**जयहिंद!!** **जय सहकार !!** **जय महाराष्ट्र !!**

आपला नम्र,

**श्री.रमेश दाजी बांगर**
**चेअरमन**

कळवा मध्य.ग्राहक सह.संस्था मर्यादित, कळवा,ठाणे.

सहकार बझार

कळवा मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्था मर्यादित,

कळवा, ठाणे – ४०० ६०५

*** शाखावार माहिती ***

सन २०२५ – २६

| अ.क्र. | शाखा | शाखा सुरु किंवा रुपांतर | विक्रीची जागा (चौ. फुटात) | कर्मचारी | विक्री रु.लाख | व्यापारी नफा रु.लाख | व्यापारी नफ्याचे विक्रीशी प्रमाण | शिल्लक माल रु.लाख | स्टॉक रोटेशन | दैनंदिन विक्री रु. लाख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | स्वयंसेवा कळवा शाखा<br>नवीन वास्तूत स्थलांतर | १०/१२/१९८८<br>१५/०३/२०११ | १८०० | ३१ | १०९५.९९ | १५५.४३ | १४.१९ | ११२.९२ | १० | ३.०० |
| २) | स्वयंसेवा-२ खारीगांव शाखा | ०४/०४/१९९२ | ११४५ | १५ | ५९७.२२ | ८४.७६ | १४.२१ | २८.७८ | २२ | १.६३ |
| ३) | स्वयंसेवा ऐरोली शाखा | २४/०२/१९९६ | १४०० | १ | १३०.०३ | १८.२९ | १४.०७ | १३.५१ | ११ | ०.३५ |
| ४) | स्वयंसेवा नेरुळ शाखा | २२/१०/२००० | २३०० | ३ | २१०.५४ | २३.६४ | ११.२३ | २८.५४ | ९ | ०.५७ |
| ५) | स्वयंसेवा विटावा शाखा | ३०/०५/२००४ | १७०० | ११ | ३७६.०९ | ५१.१० | १३.५९ | १९.१० | २० | १.०३ |
| ६) | सहकार मेडिकल,कळवा | १२/०५/१९९४ | ३०० | ६ | २०६.९६ | २७.७० | १३.३८ | २४.९९ | ९ | ०.५७ |
| ७) | दुग्ध विभाग | १९६९-१९७० | ४०० | १ | ५०.२७ | ३.१८ | ६.३४ | ० | ३६५ | ०.१४ |
| ८) | शिधावाटप विभाग (सहा) | १९४६-१९४७ | १३६० | २ | ०.०६ | -०.४४ | ० | ३.१० | ० | ०.०० |
| ९) | स्वयंसेवा -१० खारीगांव शाखा | ११/१०/२००५ | १३०० | ४ | १२१.७४ | १५.५७ | १२.८० | ११.२६ | ११ | ०.३३ |
| १०) | पोस्ट ऑफीस शाखा | ०१/१०/२००९ | ४०० | ४ | ९०.४७ | १२.२९ | १३.५९ | ७.९१ | १२ | ०.२५ |
| ११) | स्वयंसेवा दिघा शाखा | ०५/१२/२०१४ | १५०० | ६ | १६५.२४ | २१.९८ | १३.३१ | १३.१२ | १२ | ०.४५ |
| १२) | स्वयंसेवा खारीगाव आनंद विहार शाखा | ०७/०९/२०१५ | ४७३ | २ | ६३.७२ | ९.४३ | १४.८० | ५.८८ | ११ | ०.१९ |
| १३) | आर्यावर्त गोडावून | ०८/०९/१९९२ | ८०० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०.०० |
| १४) | मुख्य कार्यालय | | १८०० | १८ | ० | ० | ० | ० | ० | ०.०० |
| १५) | न्यू शिवाजी नगर शाखा | २६/०१/२०२४ | ४५० | ३ | ६६.०२ | ८.६७ | १३.१५ | ७.४० | ९ | ०.१८ |
| | | | **१७१२८** | **१०७** | **३१७४.३५** | **४३१.६०** | **१३.६०** | **२७६.५१** | **०** | **८.६९** |

वार्षिक खरेदीवर ग्राहक बोनस व सणासुदीनिमित्त आकर्षक भेटवस्तू.



संस्थेच्या सभासद, ग्राहक व कर्मचा–यांसाठी मोफत नेत्र व आरोग्य तपासणी शिबीर.



सोलापूर जिल्ह्यातील अतिवृष्टीमध्ये पुरग्रस्त झालेल्या नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंची पाकीटे वाटप करण्यात आली.

## ✻ सहकार बझार ✻

## ✻ प्रगती दृष्टिक्षेप ✻ सन २०१६-२०१७ ते २०२५-२०२६

| वर्ष | सभासद संख्या | भाग भांडवल ₹ लाख | खेळते भांडवल ₹ लाख | एकूण विक्री ₹ लाख | व्यापारी नफा ₹ लाख | निव्वळ नफा ₹ लाख | ऑडिट वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१६–२०१७ | ७२०७ | ८८.५४ | ८०२.१८ | ३५०७.५० | ३८९.२४ | ४०.०१ | ''अ'' |
| २०१७–२०१८ | ७२२५ | ९०.०६ | ८९६.९४ | ३४१६.२९ | ३८६.७९ | ४२.९७ | ''अ'' |
| २०१८–२०१९ | ७२७० | ९४.०३ | ९७४.९१ | ३५२१.८५ | ३९८.३८ | ३८.३६ | ''अ'' |
| २०१९–२०२० | ७३३८ | ९६.९० | १०४९.४४ | ३६०५.२५ | ४१५.९१ | ३८.४५ | ''अ'' |
| २०२०–२०२१ | ७३३९ | ९६.१८ | १०१८.६५ | ३०२७.०४ | ३४९.६२ | ३५.४२ | ''अ'' |
| २०२१–२०२२ | ७४१० | ९७.६१ | १०६५.३८ | ३२०४.५२ | ३७४.१८ | ३०.१६ | ''अ'' |
| २०२२–२०२३ | ७४७० | १०१.०८ | १०८३.५५ | ३०६१.०९ | ३५४.१३ | २६.८६ | ''अ'' |
| २०२३–२०२४ | ७५४२ | १०३.५५ | १०६६.३३ | २९७५.७९ | ३६६.९७ | १७.१३ | ''अ'' |
| २०२४–२०२५ | ७५५८ | १०३.०४ | ११३०.७४ | ३०१९.४२ | ४०२.८४ | २४.१३ | ''अ'' |
| २०२५–२०२६ | ७५७७ | १०४.०७ | १२२०.६२ | ३१७४.३५ | ४३१.६० | ३६.८९ | ''अ'' |

योग्य किंमतीची हमी–उत्तम सेवा.

## व्यापारी पत्रक व नफा - तोटा पत्रक दि.०१ एप्रिल, २०२५ ते ३१ मार्च, २०२६ अखेरचे

| दि. ३१ मार्च २०२५ | खर्च तपशील | | दि. ३१ मार्च २०२६ |
|---|---|---|---|
| रु. पैसे | | | रु. पैसे |
| २१३४३२६०.३८ | सुरुवातीचा शि.माल व बारदान | | २४४५२५५०.८८ |
| २६२३१२२२५.३० | खरेदी | | २७५२२७५२२.०८ |
| १५१९०८०.४० | पॅकींग मटेरीयल | | १२२५५७२.५० |
| ८८३९८४.०० | गाडी भाडे व इतर | | ७६६१०१.०० |
| ५२३००.०० | लेबल स्टेशनरी | | २८४४५६.०० |
| ४०२८३९१०.८५ | व्यापारी नफा | | ४३१६०१६१.९५ |
| ३२६३९४७६०.९३ | बेरीज | | ३४५११६३६४.४१ |
| | दिलेले व्याज | | |
| ७१२६०२.५० | बँक कर्ज, डिपॉ. ठेवी व इतर | | |
| | पगार, भत्ते व इतर | | ७६०३३३.५० |
| १९४७३७५८.०० | सेवक पगार | १९७८४५४९.०० | |
| २५८७२७०.०० | सेवक बोनस व सानुग्रह अनुदान | ३०६९६८५.०० | |
| १९९२२२०.०० | सेवक भविष्य निधी अंशदान व चार्जेस | २०३०१६२.०० | |
| ५९४३५.०० | सेवक दिवाळी भेट | ६९१७७.७२ | |
| ५६५७६१.०० | सेवक राज्य विमा योजना | ५२३६७३.०० | |
| १४५७९२.०० | सेवक गणवेश | १२६४०.०० | |
| ३९९४.०० | सेवक वैद्यकीय मदत | १००९२.०० | |
| १३५७४.०० | महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ | १५३५०.०० | |
| ४४९७.०० | सभासद व सेवक प्रशिक्षण खर्च | ४७४२२.०० | २५५६२७५०.७२ |
| १११३७५.०० | संचालक मिटिंग भत्ता | | १०७६२५.०० |
| | टपाल, छपाई व लेखन सामुग्री | | |
| २५७०.०० | पोस्टेज | ३४२४.०० | |
| ४९५०२७.१६ | छपाई व लेखन सामुग्री | ३१३९६७.६५ | ३१७३९१.६५ |
| | भाडे, कर, फी व वीज बत्ती | | |
| २८३२४३४.०० | दुकान जागा भाडे | २९५९५९३.०० | |
| ६८५४५७.०० | कर इमारत व वाहन | ६७७९४०.०० | |
| ५०००.०० | व्यवसाय कर | ०.०० | |
| १०१३९०.०० | लायसेन्स व नुतनीकरण | १५४७८५.०० | |
| १५००००.०० | ऑडीट फी | ४४२८००.०० | |
| ११०१९६६.०० | कायदेविषयक व सल्लागार फी | १२१७०००.०० | |
| २५७५८८.०० | पाणी बिल | १४०८७.०० | |
| २७२४०३४.०० | इलेक्ट्रीसिटी चार्जेस | ३०६३६७५.९२ | |
| ७८२३८२.२५ | सर्व्हीस चार्जेस | ७६९८८२.४६ | |
| ७९४४१.३० | टेलिफोन चार्जेस | ९५८१५.९१ | |
| ११६५४९.२५ | विमा | ११४७६८.१२ | ९५१०३४७.४१ |
| ३५००४११७.४६ | पुढील पानावर | | ३६२५८४४८.२८ |

कोणत्याही प्रकारची फसवेगिरी नाही किंवा फसवी जाहिरात नाही

## व्यापारी पत्रक व नफा - तोटा पत्रक दि.०१ एप्रिल, २०२५ ते ३१ मार्च, २०२६ अखेरचे

| दि. ३१ मार्च २०२५ | खर्च तपशील | दि. ३१ मार्च २०२६ |
|---|---|---|
| रु. पैसे | | रु. पैसे |
| ३०१७१३१२८.५० | विक्री | ३१७२५२५५७.३१ |
| २२९०८१.५५ | रिकामे बारदान व डबे व इतर जमा | १८२७७८.०० |
| २४४५२५५०.८८ | अखेर शिल्लक माल व बारदान | २७६४९४५२.१० |
| ०.०० | अखेर बारदान स्टॉक | १६२०.०० |
| ०.०० | इंन्शूरंन्स क्लेम जमा | २९९५७.०० |
| ३२६३९४७६०.९३ | बेरीज | ३४५११६३६४.४१ |
| ४०२८३९१०.८५ | व्यापारी नफा | ४३१६०१६१.९५ |
| ३४७८८७९.०० | मुदत ठेवीवरील मिळालेले व इतर व्याज | ३९०४४३४.६३ |
| ४६६३०८१.२० | इमारत भाडे | ४५९७२४५.९८ |
| २९४४४४०.३९ | इतर जमा | २१६१८९७.२६ |
| २५२३५.४६ | शेअर्स लाभांश | २४७१०.८० |
| १३२९८.०० | आयकर परताव्यावरील व्याज | ३४११७.०० |
| ५१४०८८४४.९० | पुढील पानावर | ५३८८२५६७.६२ |

ग्राहक सेवा हिच ईश्वर सेवा.

## व्यापारी पत्रक व नफा - तोटा पत्रक दि.०१ एप्रिल, २०२५ ते ३१ मार्च, २०२६ अखेरचे

| दि. ३१ मार्च २०२५ | खर्च तपशील | पोट रक्कम | दि. ३१ मार्च २०२६ |
|---|---|---|---|
| रु. पैसे | | रु. पैसे | रु. पैसे |
| ३५००४११७.४६ | मागील पानावरुन | | ३६२५८४४८.२८ |
| | सर्वसाधारण व इतर खर्च | | |
| ५८९३९.०० | इमारत दुरुस्ती | ३३१५७.०० | |
| ७३३८९.३० | इलेक्ट्रीक दुरुस्ती | ८७८३०.६६ | |
| १३३८६४.०२ | डेडस्टॉक दुरुस्ती | १४७३३६.८६ | |
| २९४७६१८.९८ | कार्यालयीन खर्च | ३३७१५९९.३१ | |
| ४४७४७८.४८ | किरकोळ खर्च | ५७३६५४.८४ | |
| ४४९०९.०० | प्रवास खर्च | ३९०२०.०० | |
| ४३५३८४.५८ | वाहन खर्च व दुरुस्ती | ५४२०५०.९८ | |
| २८७१२५.५७ | जाहिरात खर्च | ३५६३७.३६ | |
| १७५६६५.०० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च (अहवाल छपाई) | २३९१८७.४४ | |
| ६५१३२३.०० | ग्राहक सूट | ७५८५६८.३८ | |
| ४३६१३.४९ | दुध विक्री वरील खर्च | ३८१२६.०२ | |
| २३५५९६.२५ | सभा समारंभ, वर्धापनदिन, रोषणाई | ३७३५९२.०५ | |
| ०.०० | कॅश चोरी तोटा | ४८५०५.५० | |
| ३०३५०४.६० | क्रेडीट कार्ड विक्रीवरील खर्च | २७७७५४.४६ | |
| ९५४७९.९२ | बँक चार्जेस | १७११२३.४४ | |
| ३५००९.०० | किराणा खरेदीवरील खर्च | ३९९००.०० | |
| ६००००.०० | कॉन्ट्रॅक्टच्युअल पेमेंट | ४५०००.०० | |
| १०००००.०० | आयकर (तरतुद) | २५००००.०० | |
| ४२७७५८.०० | ग्रॅच्युएटी (तरतुद) | ५०००००.०० | |
| ५६३००००.०० | वस्तू व सेवाकर | ४७५००००.०० | |
| १८८५०.०० | कायदेविषयक खर्च | ८०७५.०० | |
| ५८२८.०० | टीडीएस्/लेटफी/व्याज/नोटीस खर्च | १०५९.०० | |
| २०००००.०० | अमृत महोत्सव खर्च | ०० | १२३३११७८.३० |
| | घसारा | | |
| ८४७२७९.०० | इमारत | ८११३८३.३४ | |
| ७३१६१९.२७ | डेडस्टॉक, मशिनरी व वाहन | ७९०८९९.३७ | |
| १३५४.०० | लायब्ररी | १४४०.०० | १६०३७२२.७१ |
| २४१३१३८.९८ | निव्वळ नफा | | ३६८९२१८.३३ |
| ५११४०८८४४.९० | एकूण बेरीज | | ५३८८२५६७.६२ |

माझ्या अहवालाच्या शेऱ्यास पात्र राहून

ठिकाण : कळवा, ठाणे
दिनांक : १६ जुलै २०२६

**श्री. बाळासाहेब शांतीनाथ कोरडे**
वैधानिक लेखापरीक्षक
को-ऑपरेटिव्ह एम्पॅनलमेंट क्र. अ -१-१८०३९
सहकारी संस्था, ठाणे .
UDIN : 26014688JQGBVJ8634

**श्री. सुरेश आर. बारी**
कर सल्लागार आणि प्रमाणित लेखापरीक्षक
को-ऑपरेटिव्ह एम्पॅनलमेंट क्र - बी-२-१७४८५

**ग्राहकांसाठी क्रेडिट/डेबिट कार्ड सुविधा उपलब्ध.**

## व्यापारी पत्रक व नफा - तोटा पत्रक दि.०१ एप्रिल, २०२५ ते ३१ मार्च, २०२६ अखेरचे

| दि. ३१ मार्च २०२५ | जमा तपशील | दि. ३१ मार्च २०२६ |
|---|---|---|
| रु. पैसे | | रु. पैसे |
| ५१४०८८४४.९० | मागील पानावरुन | ५३८८२५६७.६२ |
| ५१४०८८४४.९० | एकूण बेरीज | ५३८८२५६७.६२ |

श्री. अ. प्र. ओजाळे
चिटणीस

श्री. रा. न. भोईर
व्हा. चेअरमन

श्री. रमेश दा. बांगर
चेअरमन

## ताळे बंद पत्रक दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर

| दि.३१ मार्च २०२५ | भांडवल व देणी | पोटरक्कम | दि.३१ मार्च २०२६ |
|---|---|---|---|
| रु. पैसे | | रु. पैसे | रु. पैसे |
| | अधिकृत भागभांडवल | | |
| १५०००००००.०० | प्रत्येकी रु.१०/- चे १५,००,००० भाग | | १५०००००००.०० |
| | वसुल भाग भांडवल | | |
| १०२९७०७०.०० | १) अ वर्ग , वैयक्तिक सभासद | १०४००३००.०० | |
| ७,१७०.०० | २) ब वर्ग , सहकारी संस्था | ७,१७०.०० | १०४०७४७०.०० |
| | राखीव व इतर निधी | | |
| १७६८५५९२.६९ | राखीव निधी | १८८४५४५०.०९ | |
| १५५३०५२९.७१ | इमारत निधी | १५६८७५२९.७१ | |
| ५०५९९३.८१ | धर्मादाय निधी | ५०५२४८.८१ | |
| १२३०६८९.०५ | लाभांश समकरण निधी | १२७८९६२.०५ | |
| १६५८१५५.२२ | अधिलाभांश समकरण निधी | १७७८८३६.२२ | |
| ९५८४६९.२९ | चढउतार निधी | ९८२६०६.२९ | |
| ४८१९३९.५८ | सभासद कल्याण निधी | ४६८०६८.५८ | |
| ७९८१९९.५० | विशेष विकास निधी | ८१६७०३.५० | |
| ९१७८०४.८४ | स्पेशल इमर्जन्सी निधी | ९३६३०८.८४ | |
| ११७४७९२.०० | गरजांमध्ये बदल निधी | १२११८००.०० | ४२५११५१४.०९ |
| | ठेवी | | |
| ६३३४०००.०० | सभासद मुदत ठेव | | ८०१९०००.०० |
| | घेतलेली कर्ज | | |
| १७१९११७.९० | ठाणे जि.म.स.बँक ओ.डी.(१६१/१४) | ८४८८७९.१७ | |
| २३१५५.०६ | ठाणे जि.म.स.बँक ओ.डी.(१६१/११) | १६७६९८.०० | १०१६५७७.१७ |
| | बँकेतील शिल्लक | | |
| ५६५६४.८५ | जी.पी.पारसिक स.बँक कळवा शाखा | ०.०० | |
| | डिपॉझीट व अनामत :- | | |
| ११८३१४३.०० | सेवक सिक्युरिटी | १२७८१०३.०० | |
| ३५२५५.०० | दुध विक्री अनामत | ३५२५५.०० | |
| ९,०००.०० | जागा भाडे डिपॉझीट (अनामत) | ९,०००.०० | |
| ३३११६६९.०० | डिपॉझीट जमा (अनामत) | ३०११६६९.०० | ४३३४०२७.०० |
| ८५७४२४.९२ | मागणी न केलेला लाभांश :- | | ६०८१५५.५७ |
| | इतर देणी :- | | |
| ३२९११७२४.१९ | व्यापारी देणी | ३५९०३८४७.५६ | |
| २३०४९१७.४६ | किरकोळ देणी | २३२३८०८.५८ | ३८२२७६५६.१४ |
| ९९९९२४५७.०७ | पुढील पानावर | | १०५१२४३११.९७ |

कोणत्याही प्रकारची फसवेगिरी नाही किंवा फसवी जाहिरात नाही

## ताळे बंद पत्रक दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर

| दि.३१ मार्च २०२५ | भांडवल व देणी | पोटरक्कम | दि.३१ मार्च २०२६ |
|---|---|---|---|
| रु. पैसे | | रु. पैसे | रु. पैसे |
| | रोख व बँकेतील शिल्लक :- | | |
| १३४९७९३.९६ | हातातील रोख शिल्लक | १६५८२५१.९५ | |
| २१५४३.६६ | ठाणे जि.म.स.बँक लि.(सेव्हिंग्ज) | ३९७३३.६० | |
| ३२७५०.२६ | ठाणे जि.म.स.बँक लि.(करंट) | २५७९८७८.७३ | |
| ०.०० | जी.पी.पारसिक सहकारी बँक लि.कळवा शाखा | १७८५३०.६० | |
| १६६८६.७० | जी.पी.पारसिक सहकारी बँक लि.खारीगांव शाखा | ५४७२.७० | |
| ७१३०.५९ | जी.पी.पारसिक सहकारी बँक लि.ऐरोली शाखा | ६३१०.५९ | |
| १३२५८३.९७ | एच डी एफ सी बँक | ७९७१४.३५ | |
| ७८०१.०४ | जी.पी. पारसिक सहकारी बँक लि.नेरुळ शाखा | १३३५१.४८ | |
| १२०४७.६१ | बँक ऑफ इंडिया.कळवा. | ०.०० | |
| १३८५०.०० | जी.पी पारसिक सहकारी बँक लि.खारीगांव शाखा-१० | १३८५०.०० | |
| १३४९६१.६८ | जी.पी.पारसिक सहकारी बँक लि.(G-Pay A/C) | ४४२२५४.०७ | |
| १४४०२४.१६ | आय सी आय सी आय बॅंक खाते | ९९२१८.१३ | |
| ८८९०८.६४ | जी.पी.पारसिक सहकारी बँक लि.ऐरोली मेडिकल | ८८९०८.६४ | |
| १८७१७.४० | यूनिटी स्मॉल फायनान्स बँक | ३१९५८.८३ | ५२३७४३३.६७ |
| | गुंतवणूक :- | | |
| ६००००.०० | दि ठाणे जि.म.सह.बँक लि. ( भाग ) | ६००००.०० | |
| ५००.०० | समर्थ को-ऑ.कन्झ्यु सेन्ट्र.स्टो. | ५००.०० | |
| ५००.०० | आर्यावर्त को.ऑप.हौ.सोसा.(भाग ) | ५००.०० | |
| २५०.०० | निसर्ग को-ऑप.हौ.सोसा.(भाग) | २५०.०० | |
| २५०.०० | श्री.सुदाम को.हौ.सोसा.(भाग) | २५०.०० | |
| २२०८२८८७.०० | ठाणे जि.म.स.बँक लि.(मु.ठेव) | २२२२९१०३.०० | |
| ५००८९७७.०० | ठाणे जि.म.स.बँक लि.(राखीव निधी) | ५११०२५०.०० | |
| २३२५८२.०० | ठाणे जि.म.स.बँक लि.( भा. भा. वि.नि.) | २३२५८२.०० | |
| २५०००.०० | महा. स्टेट केमिस्ट अँड ड्रगिस्ट | २५०००.०० | |
| ४०००००.०० | जी.पी पारसिक सहकारी बँक लि.(ग्रॅच्युईटी) | ४०००००.०० | |
| २४४७५२९४.०० | जी.पी पारसिक सहकारी बँक (मुदत ठेव) | २७६२९७५३.०० | |
| १००००.०० | महा.स्टेट को.ऑप.कं.फेडरेशन | १००००.०० | |
| ५००.०० | सावित्री पेरी छाया हौसिंग सोसायटी (भाग) | ५००.०० | |
| ३६७७७०.०० | इक्वीटी वॉरंटस ऑफ युनिटी बँक | ३६७७७०.०० | |
| १४७१०८०.०० | प्रेफरन्स शेसर्अ ऑफ युनिटी बँक | १४७१०८०.०० | ५७५३७५३८.०० |
| | डिपॉझिट :- | | |
| ४२५००.०० | लायसेन्स व सिक्युरिटी | ४२५००.०० | |
| ४३४०५.४९ | टेलिफोन | ४३४०५.४९ | |
| ३१४९५५.०० | इलेक्ट्रिक मीटर | ३१४९५५.०० | |
| ३८४००.०० | पाणी मीटर | ३८४००.०० | |
| ८६९९९६.०० | दुकान जागा भाडे | ८६९९९६.०० | |
| ७५०००.०० | श्री.वारणा स.दु.उ.प्र.सं.मर्यादित | ७५०००.०० | |
| १५०००.०० | शिवामृत दुध उत्पादक संघ लि. | १५०००.०० | |
| ४९०५.०० | सिटी इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कार्पोरेशन | ४९०५.०० | |
| ६००००.०० | हॉल भाडे डिपॉझीट | ६००००.०० | |
| १२८००.०० | नवी मुंबई महानगरपालिका | १२८००.०० | १४७६९६१.४९ |
| ५७५९३३५१.१६ | पुढील पानावर | | ६४२५११९३३.१६ |

## ताळे बंद पत्रक दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर

| दि.३१ मार्च २०२५ रु. पैसे | भांडवल व देणी | पोटरक्कम रु. पैसे | दि.३१ मार्च २०२६ रु. पैसे |
|---|---|---|---|
| ९९९९२४५७.०७ | मागील पानावरुन | बेरीज | १०५१२४३९९.९७ |
| | देणे तरतूदी :- | | |
| १५००००.०० | ऑडिट फी | ४४२८००.०० | |
| २८९००९७.९६ | सेवक बोनस व सानुग्रह अनुदान | ३४३९३६१.९६ | |
| ४४४४१६.४८ | कन्झुमर्स बोनस | ३६६३९५.०३ | |
| ९५५०००.०० | कायदेविषयक व सल्लागार फी | १६०५०००.०० | |
| १२७५०००.०० | आयकर तरतूद | १५२५०००.०० | |
| २१३५१३.५० | एफ.डी मुदत ठेव | २५२७५८.५० | |
| १४४२३३.५० | शॉप रेन्ट देणे | ३४१४२९.०० | |
| ४०४२.८७ | टेलिफोन चार्जेस देणे | ७०२२.८१ | |
| २३२५७३.९० | इलेक्ट्रीसिटी चार्जेस देणे | २९१५३०.१४ | |
| ३५१२७.०० | क़िराणा खरेदी चार्जेस देणे | ३९९००.०० | |
| १५१२०.०० | इतर चार्जेस देणे | ०.०० | |
| ७०००.०० | मेंटेन्टस चार्जेस देणे | ७०००.०० | |
| ३२११६८.०० | एल.आय.सी. ग्रुप ग्रच्युईटी | ४००९९४.६९ | |
| ११७६७३५.०० | अमृत महोत्सव सोहळा व इतर | ११४६७३५.०० | |
| १६९९१२४.६६ | वस्तू व सेवाकर देणे | २२८१३६०.७८ | |
| ११०००००.०० | पंजाब व महाराष्ट्र बँक मुदत ठेव तरतुद | ११०००००.०० | १३२४७२८७.९१ |
| | इतर खर्च व देणे | | |
| ५३६१.६० | क्रेडिट कार्ड | | ३८२.०० |
| | नफा-तोटा :- | | |
| ४८०.९२ | ३१ मार्च २०२५ अखेरचा शि.नफा | १०४३.९० | |
| २४१३१३८.९८ | अधिक : ३१मार्च २०२६ चा नफा | ३६८९२१८.३३ | ३६९०२६२.२३ |
| ११३०७४५९१.४४ | एकूण बेरीज | | १२२०६२३३२.११ |

माझ्या अहवालाच्या शेऱ्यास पात्र राहून

ठिकाण : कळवा, ठाणे
दिनांक : १६ जुलै २०२६

**श्री. बाळासाहेब शांतीनाथ कोरडे**
वैधानिक लेखापरीक्षक
को-ऑपरेटिव्ह एम्पॅनलमेंट क्र. अ -१-१८०३९
सहकारी संस्था, ठाणे .
UDIN : 26014688JQGBVJ8634

**श्री. सुरेश आर. बारी**
कर सल्लागार आणि प्रमाणित लेखापरीक्षक
को-ऑपरेटिव्ह एम्पॅनलमेंट क्र - बी-२-१७४८५

## ताळे बंद पत्रक दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर

| दि.३१ मार्च २०२५ रु. पैसे | भांडवल व देणी | पोटरक्कम रु. पैसे | दि.३१ मार्च २०२६ रु. पैसे |
|---|---|---|---|
| ५७५९३३५१.१६ | मागील पानावरून | | ६४२५१९३३.१६ |
| | अखेर शिल्लक माल :- | | |
| ९८६७५५४.०० | कळवा शाखा | ११२९२३८०.०० | |
| २५९३१७४.०० | खारीगांव शाखा-२ | २८७७७७६.०० | |
| १०६४८३१.०० | ऐरोली शाखा | १३५१०४८.०० | |
| २००५६३२.५८ | नेरुळ शाखा | २८५३७९९.०० | |
| १९१६९६५.०० | विटावा शाखा | १९०९९२२.०० | |
| २०२९४६९.०० | सहकार मेडिकल स्टोअर्स,कळवा | २४९८७०४.०० | |
| ३०१५३१.३० | नियंत्रित माल | ३०८०२४.१० | |
| १०७०२५८.०० | खारीगांव शाखा-१० | ११२५७१२.०० | |
| ६७३३५१.०० | पोस्ट ऑफीस शाखा | ७९१३५३.०० | |
| १५५६७५३.०० | दिघा शाखा | १३११५२१.०० | |
| ५९९७३३.०० | खारीगांव-१२ आनंदविहार शाखा | ५८८५२७.०० | |
| ७७३२९९.०० | न्यू शिवाजी नगर शाखा | ७४०६८६.०० | |
| ०.०० | अखेर शिल्लक बारदान स्टॉक | १६२०.०० | २७६५१०७२.१० |
| | कायम मालमत्ता :- | | |
| ३५१७४७९.५८ | डेडस्टॉक (फर्निचर,मशीनरी,वाहन) | ४०३८८२७.८९ | |
| १८२७०३०९.४० | स्थावर जंगम (इमारत) | १७५८८२४९.०० | |
| १२१८६.०० | लायब्ररी | १२९५५.०० | २१६४००३१.८९ |
| | इतर येणी :- | | |
| ९५८५८९.७५ | ॲड्व्हन्स इन्कम टॅक्स | १००८५८९.७५ | |
| ८२२२०२.५० | टी.डी.एस. | ९२३७५२.३३ | |
| ६५०४.४६ | टी.सी.एस.रिसिव्हेबल | ०.०० | |
| ४२३६७.४२ | आगाऊ विमा | ५४६२०.६४ | |
| २८५४८१.७५ | ॲडव्हान्स व अनामत | ३३१३९.७५ | |
| ५०८२६३५.०० | येणे व्याज (मुदत ठेवीवरील) | ५०४८५३३.०० | |
| ४३०७००.०० | शिल्लक पॅकींग मटेरीयल | ५१६५००.०० | |
| १११६७०.७० | शिल्लक स्टेशनरी | ९६१२५.०० | |
| २१०५३.६० | रेशन खरेदी भाववाढ/घट | ०.०० | |
| ९१३०००.०० | जागा भाडे | ६००३००.०० | |
| २१७७९.२४ | प्लक्सी कार्ड (सोडेक्सो) | १६७३४.४९ | |
| ५३२७३०.०० | इतर जमा | २२१०००.०० | ८५१९२९४.९६ |
| ११३०७४५९१.४४ | एकूण बेरीज | | १२२०६२३३२.११ |

| श्री. अ. प्र. ओजाळे | श्री. रा. न. भोईर | श्री. रमेश दा. बांगर |
|---|---|---|
| चिटणीस | व्हा. चेअरमन | चेअरमन |

# कळवा मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्था मर्यादित

## सन २०२६-२०२७ वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक

| तपशिल | सन २०२५-२६ चे अदाजपत्रक | सन २०२५-२६ ची प्रत्यक्ष स्थिती | अंदाजपत्रकातील फरक | | सन २०२६-२७ चे अदाजपत्रक | तपशिल | सन २०२५-२०२६ चे अदाजपत्रक | सन २०२५-२०२६ ची प्रत्यक्ष स्थिती | अंदाजपत्रकातील फरक | | सन २०२६-२७ चे अदाजपत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कमी | जास्त | | | | | कमी | जास्त | |
| सुरुवातीचा शिल्लक माल | २,४४,५२,५५०.०० | २,४४,५२,५५०.८८ | - | - | २,७६,५१,०७२.०० | अपेक्षित विक्री | ३०,९५,००,०००.०० | ३१,७२,५२,५५७.३१ | - | ७७,५२,५५७.३१ | ३२,५५,००,०००.०० |
| खरेदी | २६,५५,००,०००.०० | २७,५२,२७,५२२.०८ | | ९७,२७,५२२.०८ | २८,०५,००,०००.०० | रिकामे बारदान | २,५४,४००.०० | १,८२,७७८.०० | ७१,६२२.०० | - | २,२५,०००.०० |
| गाडीभाडे, पॅकींग मटेरीयल | २५,०५,०००.०० | २२,७६,१२९.५० | २,२८,८७०.५० | | २५,८०,०००.०० | अखेर शिल्लक माल | २,४५,००,०००.०० | २,७६,५१,०७२.१० | - | ३१,५१,०७२.१० | ३,०८,००,०००.०० |
| ढोबळ नफा | ४,१७,९६,८५०.०० | ४,३१,६०,१६१.९५ | | १३,६३,३११.९५ | ४,५७,९३,९२८.०० | इन्शूरन्स क्लेम जमा | | २९,९५७.०० | - | २९,९५७.०० | - |
| **एकूण रुपये** | **३३,४२,५४,४००.००** | **३४,५१,१६,३६४.४१** | | | **३५,६५,२५,०००.००** | **एकूण रुपये** | **३३,४२,५४,४००.००** | **३४,५१,१६,३६४.४१** | | | **३५,६५,२५,०००.००** |
| ठेवींवरील दिलेले व्याज | ७,५०,०००.०० | ७,६०,३३३.५० | - | १०,३३३.५० | ८,५०,०००.०० | ठेवींवरील मिळालेले व्याज | ३५,५०,०००.०० | ३९,०४,४३४.६३ | - | ३,५४,४३४.६३ | ४१,००,०००.०० |
| पगार भत्ते व इतर | २,६०,००,०००.०० | २,५५,१५,३२८.७२ | ४,८४,६७१.२८ | - | २,७५,००,०००.०० | इमारत भाडे | ५४,१५,०००.०० | ४५,९७,२४५.९८ | ८,१७,७५४.०२ | - | ४९,००,०००.०० |
| संचालक उपस्थिती | १,१५,०००.०० | १,०७,६२५.०० | ७,३७५.०० | - | १,१०,०००.०० | इतर जमा | ३०,५०,०००.०० | २१,६१,८९७.२६ | ८,८८,१०२.७४ | - | २९,५०,०००.०० |
| टपाल, छपाई सामुग्री | ६,००,०००.०० | ३,१७,३९१.६५ | २,८२,६०८.३५ | - | ५,००,०००.०० | शेअर्स लाभांश | २५,०००.०० | २४,७१०.८० | २८९.२० | - | २५,०००.०० |
| भाडेकर, फी,वीजबत्ती | ८५,५०,०००.०० | ७८,५०,५४७.४१ | ६,९९,४५२.५९ | - | ८२,००,०००.०० | आयकर परताव्यावरील व्याज | - | ३४,११७.०० | - | ३४,११७.०० | - |
| आयकर वस्तु व सेवाकर | ६४,००,०००.०० | ५०,००,०००.०० | १४,००,०००.०० | - | ५९,००,०००.०० | शाखावार व्यापारी नफे | | | - | - | ०.०० |
| ऑडीट फी | २,००,०००.०० | ४,४२,८००.०० | - | २,४२,८००.०० | ४,००,०००.०० | कळवा शाखा | १,६०,००,०००.०० | १,५५,४३,३१९.१० | ४,५६,६८०.९० | - | १,५९,००,०००.०० |
| कायदेविषयक सल्ला फी | १५,००,०००.०० | १२,१७,०००.०० | २,८३,०००.०० | - | ११,५०,०००.०० | खारीगांव शाखा क्र.२ | ९२,००,०००.०० | ८४,७६,१२९.९० | ७,२३,८७०.१० | - | ८९,००,०००.०० |
| ग्राहक सूट | ६,५५,०००.०० | ७,५८,५६८.३८ | - | १,०३,५६८.३८ | ८,००,०००.०० | ऐरोली शाखा | १५,६०,०००.०० | १८,२८,६८५.११ | - | २,६८,६८५.११ | २१,५०,०००.०० |
| सर्वसाधारण व इतर खर्च | ६०,००,०००.०० | ६०,७२,६०९.९२ | - | ७२,६०९.९२ | ६१,५०,०००.०० | नेरुळ शाखा | २२,५०,०००.०० | २३,६४,१४३.२८ | - | १,१४,१४३.२८ | २५,५०,०००.०० |
| घसारा | १६,५०,०००.०० | १६,०३,७२२.७१ | ४६,२७७.२९ | - | १६,२५,०००.०० | विटावा शाखा | ५४,००,०००.०० | ५१,०९,९५१.२२ | २,९०,०४८.७८ | - | ५३,५०,०००.०० |
| ग्रॅच्युईटी | ५,००,०००.०० | ५,००,०००.०० | - | - | ४,००,०००.०० | रेशन विभाग | | (४४,२९४.२०) | ४४,२९४.२० | - | - |
| सभासद व सेवक प्रशिक्षण | २०,०००.०० | ४७,४२२.०० | - | २७,४२२.०० | ५०,०००.०० | दुध विभाग | ३,००,०००.०० | ३,१८,४७६.४० | - | १८,४७६.४० | ३,५०,०००.०० |
| अपेक्षित निव्वळ नफा | ३२,१०,०००.०० | ३६,८९,२१८.३३ | - | ४,७९,२१८.३३ | ३७,६५,०००.०० | सहकार मेडिकल,कळवा | २८,००,०००.०० | २७,६९,५४९.०७ | ३०,४५०.९३ | - | २९,००,०००.०० |
| | | | | | | दिघा शाखा | २३,००,०००.०० | २१,९७,६६२.७० | १,०२,३३७.३० | - | २२,७५,०००.०० |
| | | | | | | खारीगाव शाखा क्र.१० | १५,५०,०००.०० | १५,५७,४८७.५७ | - | ७,४८७.५७ | १७,५०,०००.०० |
| | | | | - | | पोस्ट ऑफीस शाखा | १३,००,०००.०० | १२,२८,५६२.१९ | ७१,४३७.८१ | - | १२,७५,०००.०० |
| | | | | | - | खारीगाव शाखा क्र.१२ | ९,००,०००.०० | ९,४३,२४१.४७ | - | ४३,२४१.४७ | १०,७५,०००.०० |
| | | | | | | न्यू शिवाजी नगर शाखा | ५,५०,०००.०० | ८,६७,२४८.१४ | - | ३,१७,२४८.१४ | ९,५०,०००.०० |
| **एकूण रुपये** | **५,६१,५०,०००.००** | **५,३८,८२,५६७.६२** | | | **५,७४,००,०००.००** | **एकूण रुपये** | **५,६१,५०,०००.००** | **५,३८,८२,५६७.६२** | | | **५,७४,००,०००.००** |

व्हॉट्सअ‍ॅप वरून मालाची ऑर्डर देण्याची सुविधा.

**B. S. KORDE & CO.**

**Chartered Accountant**

1, Palaye Building,
Near Prince Electronics,
Station Road, Kalwa (W),
Thane - 400 605.
Mob no : 9322288893

**दिनांक : १६.०७.२०२६**

**वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल**

(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ८१(५ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधील नियम ६९ अन्वये)

**प्रति,**
**माननीय अध्यक्ष/ सचिव,**
**कळवा मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्था मर्यादित,**
**सहकार इमारत, स्टेशन रोड,**
**कळवा (प), ठाणे ४०० ६०५.**

**आर्थिक विवरण पत्रकांवर अहवाल:**

**१. अभिप्राय:**

मी, कळवा मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्था मर्यादित, कळवा, ठाणे-०५ या संस्थेचे सोबत जोडलेल्या आर्थिक पत्रकांचे लेखापरीक्षण केले आहे, ज्यामध्ये दि. ३१ मार्च, २०२६ रोजीचे ताळेबंद पत्रक आणि त्या दिनांकास संपणारे व्यापारी व नफा तोटा पत्रक तसेच हिशोबाच्या धोरणांचा अर्थपूर्ण सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचा समावेश आहे.

माझ्या मते आणि माझ्या सर्वोत्तम माहितीनुसार तसेच मला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, हे हिशोब व त्यासोबत दिलेल्या एकत्रित टिपणी आणि त्यासोबत जोडलेली परिशिष्टे ही महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६०, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ व संस्थेचे पोटनियम तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था निबंधक यांनी वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक परिपत्रकानुसार अपेक्षित आवश्यक अशी सर्व माहिती देतात तसेच भारतामध्ये सर्वसामान्य असणाऱ्या अकाऊंटिंग तत्वांचे अनुपालन करतात आणि,

- ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१.०३.२०२६ रोजी संस्थेच्या आर्थिक परिस्थितीची, आणि
- नफा तोटा पत्रकाच्या बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या अखेरीस संस्थेच्या नफ्याची सत्य व रास्त स्थिती दर्शवितात.

**२. आर्थिक विवरण पत्रकांबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी:**

संस्थेची आर्थिक पत्रके महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्या अंतर्गत बनविलेल्या नियमान्वये तसेच संस्थेच्या पोटनियमानुसार तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. सदरच्या जबाबदारीमध्ये आर्थिक पत्रके तयार करताना आवश्यक असणाऱ्या अंतर्गत नियंत्रणासाठीचे नियम तयार करणे व त्यांची अंमलबजावणी करणे आणि वेळोवेळी त्यामध्ये सुधारणा करणे इत्यादी बाबींचा समावेश होतो, ज्यामुळे सदरची आर्थिक पत्रके ही चुका अथवा गैरव्यवहार यामुळे निर्माण होणाऱ्या गंभीर दोषापासून मुक्त राहतील.

**३. आर्थिक विवरण पत्रकाचे लेखापरीक्षण करताना लेखापरीक्षकांची जबाबदारी:**

आर्थिक हिशोब पत्रके बनविणे ही संस्थेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असून त्यावर मत प्रदर्शन करणे ही माझी जबाबदारी आहे. दि इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंटस् ऑफ इंडिया यांनी निर्देशित केलेल्या ऑडिटिंग स्टॅन्डर्ड सनुसार मी नितीतत्वांचे अनुपालन करणे तसेच लेखापरीक्षणाचे नियोजन करणे आणि त्याची अंमलबजावणी अशा

पद्धतीने करणे अपेक्षित आहे की, जेणेकरून त्या आर्थिक पत्रकांमध्ये गंभीर स्वरूपाच्या चुका नाहीत याची सर्व साधारणपणे खात्री पटेल.

लेखापरीक्षणामध्ये आर्थिक पत्रकांमधील रक्कमांच्या संदर्भातील व इतर माहितींचे पुरावे नमुना तत्वांवर तपासली जातात. लेखापरीक्षणाच्या पद्धतीची निवड ही लेखापरीक्षकांचे अनुमान तसेच आर्थिक पत्रकांमध्ये चुका अथवा अफरातफर यांमुळे निर्माण होण्या गंभीर दोषांच्या शक्यतेची पडताळणी, इत्यादींसारख्या बाबी गृहीत धरून केली जाते. विविध जोखमींची पडताळणी करून योग्य अशी लेखापरीक्षण पद्धती निवडताना, लेखापरीक्षक प्रामुख्याने, संस्थेने आर्थिक पत्रके तयार करताना अवलंबलेली अंतर्गत नियंत्रण पद्धती विचारात घेतात. परंतु, ही पद्धत संस्थेच्या अंतर्गत नियंत्रण प्रणालीच्या प्रभावीपणाबद्दल मत व्यक्त करण्याकरीता निवडली जात नाही. लेखापरीक्षणामध्ये व्यवस्थापनाने वापरलेल्या अकाऊंटिंग तत्वांच्या योग्यतेचे मूल्यमापन करणे, व्यवस्थापनाने वापरलेल्या महत्वाच्या आर्थिक अंदाजाच्या योग्यतेचे आणि आर्थिक पत्रकांच्या सादरीकरणाचे मूल्यमापन करणे याचा सुद्धा समावेश केला जातो.

माझा विश्वास आहे की, माझ्या लेखापरीक्षणादरम्यान मला मिळालेली योग्य व जरूर असलेली माहिती, पुरावे आणि खुलासे मला माझे लेखापरीक्षणाबाबतचे मत बनविण्यासाठी पर्याप्त आणि योग्य आहेत.

**४. इतर कायदेशीर व नियमावली संदर्भात अहवाल:**

संस्थेचे ताळेबंद व नफा तोटा पत्रक महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा १९६० आणि महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था नियम १९६१ च्या व संस्थेच्या पोटनियम तरतूदींना अनुसरून तयार केले आहेत.

५. सामान्य शेरे भाग अ, ब आणि क मध्ये नमूद केलेल्या शेऱ्यास अधीन राहून तसेच माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे आणि मला दिलेल्या संपूर्ण माहिती तसेच खुलाशावरून मी अहवाल देतो की,

१. अशी सर्व माहिती व स्पष्टीकरणे, जे की माझ्या ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे लेखापरीक्षणाच्या उद्देशासाठी आवश्यक होते, ते मला प्राप्त झाले आहेत आणि ते समाधानकारक आहेत.
२. माझ्या मते, लेखापरीक्षणादरम्यान तपासलेली सर्व पुस्तके कायद्यानुसार संस्थेने ठेवलेली आहेत.
३. संस्थेचा ताळेबंद व नफा तोटा पत्रक हे संस्थेची हिशोब पुस्तके व विवरण पत्रे यांना अनुसरून तयार केलेली आहेत.

**६. तसेच मी अहवाल देतो की, आर्थिक वर्ष २०२५-२६ करीता 'अ' वर्ग देण्यात येत आहे.**

ठिकाण : कळवा, ठाणे - ४०० ६०५
दिनांक : १६ जुलै, २०२६

सही

**श्री. बाळासाहेब शांतीनाथ कोरडे**
**वैधानिक लेखापरीक्षक**
**को-ऑपरेटिव्ह एम्पॅनलमेंट क्र. अ -१-१८०३९**
**सहकारी संस्था, ठाणे.**
**UDIN : 26014688JQGBVJ8634**




संस्थेच्या स्वस्त दरात भव्य तांदूळ विक्री महोत्सवाच्या गांवदेवी मैदान कळवा येथील उद्घाटन प्रसंगी मा.आमदार श्री.संजय केळकर, महाराष्ट् स्टेट कन्झुमर्स फेडरेशनचे मा.अध्यक्ष श्री.विठ्ठलराव भोसले, संस्थेचे मा.संचालक श्री.नारायण गावंड व मा.चेअरमन श्री.रमेश बांगर



सभासद व कर्मचा–यांच्या पाल्यांना शैक्षणिक गुणवत्तेप्रमाणे सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्र व रोख बक्षिस वाटप.



संस्थेच्या ८१व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस शेठ टी.जे.एज्युकेशन सोसायटी कॉलेज सभागृह, ठाणे येथे उपस्थित सभासद.



संस्थेचे भाग्यविधाते मा. श्री. नारायण गावंड साहेब हे महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लिमिटेड मुंबई या संस्थेत बिनविरोध निवडून आल्यामुळे मा. आमदार श्री. प्रविण दरेकर, अध्यक्ष महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

# कळवा मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्था मर्यादित



## -: आपल्या सेवेसाठी आमच्या शाखा :-

**१ स्वयंसेवा कळवा शाखा**
मुख्य कार्यालय, सहकार इमारत,
स्टेशन रोड, कळवा, ठाणे – ४००६०५.
मोबाईल : ८२९१९३८०८२

**२ स्वयंसेवा खारीगांव पाखाडी शाखा**
"माऊली" महानगरपालिका उद्यानाच्या बाजुला,
खारीगांव, पाखाडी, ठाणे – ४००६०५
मोबाईल : ८२९१९३८०८३

**३ स्वयंसेवा ऐरोली शाखा**
प्लॉट क्र. ३१ अ, सेक्टर – ५,
ऐरोली, नवी मुंबई.
मोबाईल : ८६५५०२०१५९

**४ डिपार्टमेंटल स्टोअर्स, नेरूळ शाखा**
प्लॉट क्र. २८ सी, सेक्टर क्र. १०,
नेरूळ, नवी मुंबई.
मोबाईल : ९०८२०६८७६६

**५ आनंद विहार खारीगांव शाखा**
आनंद विहार कॉम्प्लेक्स खारीगांव,
रेल्वे क्रॉसिंग जवळ कळवा (पू.)
मोबाईल : ८६५५०२०१५५

**६ स्वयंसेवा विटावा शाखा**
शॉप नं.१, लक्ष्मी शिमग्या कोळी
निवास जवळ, विटावा कोळीवाडा
मोबाईल : ८६५५०२०१५४

**७ स्वयंसेवा खारीगांव शाखा – १०**
सावित्री पेरीछाया इमारत, खारीगांव,
ठाणे – ४००६०५.
मोबाईल : ८२९१९३८०८६

**८ सहकार मेडिकल आणि जनरल स्टोअर्स**
सहकार इमारत नं. ३, स्टेशन रोड,
कळवा, ठाणे – ४००६०५.
मोबाईल : ८२९१९३८०८५

**९ स्वयंसेवा पोस्ट ऑफिस शाखा**
शिवदर्शन को-ऑप. हौ. सोसायटी गाळा क्र. ५ व ६,
ज्ञानप्रसारिणी शाळेच्या बाजुला, कळवा, ठाणे
मोबाईल : ८२९१९३८०८४

**१० स्वयंसेवा दिघा शाखा**
रविदर्शन इस्टेट, दिघा तलावाजवळ,
दिघा, नवी मुंबई.
मोबाईल : ८६५५०२०१५८

**११ स्वयंसेवा न्यू शिवाजीनगर शाखा**
दुकान क्रमांक २, तलावाजवळ,
न्यू शिवाजीनगर, कळवा (पूर्व).
मोबाईल : ८२९१९३८०३७

**१२ वारणा व गोवर्धन दूध विक्री केंद्रे : दहा**

**१३ स्वस्थ धान्य दुकाने : सहा**




**घरपोच यादांची सुविधा, व्हॉट्सअॅप व फोन वरून ऑर्डर्स स्वीकारल्या जातील.**

**प्रेषक**
कळवा मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्था मर्यादित
कळवा, ठाणे ४००६०५
मुख्य कार्यालय :
सहकार इमारत, स्टेशन रोड, कळवा, ठाणे – ४००६०५
मोबाईल : ८२९१९३८०८१
ई-मेल : info@sahakarbazar.com

**बुक पोस्ट**
सभासद नं
श्री./ श्रीमती.____________________
____________________
____________________
____________________



**८२ वा**

# वार्षिक अहवाल २०२५-२०२६

**वार्षिक उलाढाल ३१ कोटीच्यावर**